# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

---

दि.२०.०९.२०१८.

प्रेसनोट

<u>मोटारसायकल चोर गुन्हे शाखेच्या ताब्यात.</u>

दि.२०.०९.२०१८- काल दि.१९.०९.२०१८ रोजी गुन्हे शाखेस गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली कि, बाबा पेट्रोल पंप येथे एक इसम चोरीची मोटार सायकल विक्री करण्यासाठी येत आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून पोलीस उप निरीक्षक अनिल वाघ यांनी स्टाफसह तात्काळ बाबा पेट्रोल पंप येथे जाऊन सापळा रचून इसम नामे कादर बेग सलीम बेग, वय २५ वर्ष रा.कागजीपुरा, ता.खुलताबाद जि.औरंगाबाद यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे असलेली हिरो होंडा कंपनीची मोटार सायकल एम.एच.२० सी.एन.११०५ बाबत विचारपूस केली असता त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यास अधिक विचारपूस केली असता त्याने सदरची मोटार सायकल हि त्याचे साथीदारासह करमाड येथून चोरी केल्याची कबुली दिली.

याबाबत पोलीस स्टेशन अभिलेख तपासला असता पोलीस स्टेशन करमाड ता.जि.औरंगाबाद येथे गु.र.न.१४४ /२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे समजले वरून इसम नामे कादर बेग सलीम बेग यास मोटार सायकल सह पोलीस स्टेशन करमाड यांचे ताब्यात दिले.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त श्री.चिरंजीव प्रसाद, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) डॉ.दिपाली धाटे-घाडगे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ.नागनाथ कोडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे शाखा) मधुकर सावंत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक अनिल वाघ, पोहेकॉ/ नितीन मोरे, पोना/ शेख हकीम, मनोज चव्हाण, भगवान शिलोटे, पोकॉ/ संजय खोसरे, संतोष सूर्यवंशी, चंद्रकांत सानप, चालक ज्ञानेश्वर पवार सर्व नेमणूक गुन्हे शाखा यांनी केली आहे.

SD/-

(डॉ.नागनाथ कोडे)

पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर

करिता.